# 'आयसीडब्ल्यूए' परीक्षेतील गुणवत्ताधारकांचा सत्कार

औरंगाबाद, ता. २१ : 'औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाउंटंट'तर्फे 'आयसीडब्ल्यूए'च्या डिसेंबर २००२ मधील परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी एम. आर. पंडित होते.

प्रारंभी चॅप्टरचे स्थानिक अध्यक्ष रामानंद मोदाणी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. भरत असावा, अनुपमा शास्त्री, अनिता अमृते या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

अहमदाबाद येथील तज्ज्ञ पी. डी. मोध यांची व्याख्याने ता. २५ एप्रिलपासून सुरू होणार असून सर्व इंटरमीजिएट विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. मोदाणी यांनी केले.

प्रशिक्षण व विकास समितीचे अध्यक्ष ए. आर. जोशी यांनी व्यावसायिक परीक्षेत यश मिळविण्यासाठी अभ्यास कसा करावा, याची माहिती दिली. कठोर परिश्रम, नियोजन व अभ्यासातील सातत्य आवश्यक आहे, असे ते म्हणाले. एस. बी. खडके यांनी सूत्रसंचालन केले. राजेश शुक्ला यांनी आभार मानले.